सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००३२५**

**अपिलार्थी श्री. तुळशीदास मुरारी कवाळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रबंधक**
लोकआयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
१ ला मजला, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक**
लोकआयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
१ ला मजला, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०७.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०४.०७.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २३.०८.२०२१ | २८.०९.२०२१ | ०५.१०.२०२१ | २२.११.२०२१ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०५.०१.२०२२ रोजीच्या अर्जान्वये माहिती दिली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २८.०९.२०२१ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २२.११.२०२१ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २३.०८.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार आयकर विभागाकडे जादा भरलेली रक्कम परत मिळणेसाठी व तसेच व्याजासह नुकसान भरपाईचा प्रस्ताव मंजूर होण्याबाबत आपल्या कार्यालयाने केलेली कार्यवाहीची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.२८.०९.२०२१ रोजी अपिलार्थींना कळविले की, सदर तक्रार सन २००६- ०७ या कालावधीशी निगडीत असल्याने महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ चे कलम ८(५)(अ) मधील तरतूदीनुसार मुदतबाह्य प्रकरणी या कार्यालयास चौकशी करणे शक्य नसल्याने तसेच जादा भरणा केलेल्या आयकराचा परतावा मिळणेकामी संबंधिताकडेच परस्पर पाठपुरावा करणे उचित असल्याने आपली तक्रार मा. उप लोक आयुक्त यांच्या आदेशानुसार निकाली काढण्यात आली असून तसे आपणास दि.२४.१२.२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे. अपिलार्थींचे सदर उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी

..२/-

दि.०५.१०.२०२१ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.११.२०२१ रोजी अपिलकर्ता यांनी त्यांच्या लेखी युक्तिवादात मा. लोक आयुक्तांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्ज व अपील विचारात घेऊन त्यांच्या तक्रारीबाबत चौकशी/ कार्यवाही करावी अशी जी विनंती केलेली आहे ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) मध्ये वर्णन केलेल्या माहिती या संज्ञेत मोडत नाही असे नमुद करुन प्रथम अपील अपील खारीज केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे निवेदन दि. १०.०७.२०२४ आयोगास सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी असे सादर केले की, अपिलार्थींना या प्रकरणात चौकशी/ कार्यवाही करावी अशी माहिती अपेक्षित आहे. जे की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ शी सुसंगत नाही. सदर प्रकरण मा. उप लोक आयुक्त यांचे आदेशानुसार बंद करण्यात आले आहे. त्याप्रमाणे अपिलार्थींना संबंधीत तक्रार नस्तीमध्ये कळविण्यात आले आहे. सदर तक्रार नस्तीवर उपलब्ध असलेली सर्व माहिती तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी यापुर्वीच अपिलार्थींना दिलेली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission * Greater Mumbai *

प्रदीप व्यास 12-7-2024

**मुंबई**
**दिनांक : १२.०७.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ